# डॉ. आंबेडकरांचा राज्यसमाजवाद

प्रा. डॉ. हिराचंद चोखाजी वेस्कडे, राज्यशास्त्र विभाग प्रमुख, राजे धर्मराव कला वाणिज्य महाविद्यालय, मुलचेरा, जिल्हा गडचिरोली

.......................................................................................................................................................................

प्रस्तावना: भारतीय समाज व्यवस्थेत अनेक वर्षापासून उच्चनिचतेची पाळेमोळे रूजलेली आहेत. अस्पृशावर सततत अन्याय झााला आहे. भारतासारखी विषमता कोणत्याही देशात नाही. अस्पृष्य दलित शोशित पिडीतांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी लोकशाही शासन पद्धती उपयुक्त आहे. लोकशाही यशस्वी होण्यासाठी सामाजीक आणि आर्थीक विषमता नष्ट व्हायला पाहीजे. डॉ. आंबेडकरांनी राजकीय लोकशाहीचाच विचार केला नाही तर आर्थीक व सामाजीक क्षेत्रात लोकशाहीचा विचार केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे घटना समितीचे सभासद होते. घटना मसूदा समितीचे अध्यक्ष होते. त्यांनी घटनेचे प्रारूप तयार करतांना नागरीकाच्या मुलभूत अधिकारांचे एक स्वतंत्र प्रकरणचं घटनेत आहे. यावरून त्यांना नागरीकांच्या राजकीय सामाजीक व आर्थीक अधिकारांचे किती महत्व आहे हे दिसून येते.

डॉ. आंबेडकरांना दारिद्र्याा बद्दल खुप चिड होती. कारण त्यांनी ती स्वत: अनूभवली होती. भारतीय समाज रचना विकृत स्वरूपाची आहे. आमची समाज रचना यंत्रप्रधान आहे. अशा समाज रचनेसाठी समाजवादाची फार आवश्यकता आहे. भांडवलशाही रचना ही पाश्यात्य देशात जरी यशस्वी ठरली तरी भारतासारख्या अविकसीत देशात ती शसस्वी ठरणार नाही. तीचा फायदा मुठभर श्रीमंतानाच होईल आणि श्रीमंत अधिक श्रीमंत होतील आणि गरीब अधिक गरीब होतील. भांडवलशाही व्यवस्थेत श्रमीकांच्या व मजूरांच्या कल्यानाचा विचार होत नसतो. जेथे लोकांची परीस्थीती फार हलाकीची आहे तेथे सामाजीक परीवर्तन घडवून आणने कठीन असते. म्हणून डॉ. आंबेडकरांनी भांडवलशाहीचा विरोध केला. मार्क्स वाद किवा साम्यवाद हा जरी रशीयात यशस्वी ठरला तरीही तो भारतासाठी उपयुक्त ठरणार नाही. साम्यवाद हा वर्ग संघर्षावर आधारीत आहे. त्यामुळे व्यक्तीचे व्यक्ती स्वांताय नष्ट होते. साम्यवादी पक्ष्याची हुकुमशाही निर्माण होत. म्हणून डॉ. आंबेडकरांनी साम्यवादाचा विरोध करून समाजवादाचा पुरस्कार केला. कारण समता हा समाजवादाचा पाय असतो. समाजवादाला कोणतेही भेदाभेद मांन्य नाहीत. तरीही भारतामध्ये उचनिचनता स्पृश्य अस्पृश्यता हे भेदाभेद आहेत. म्हणून भारतात समाजवाद रूजू होण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी सामाजीक सुधारणावरचं भर दिला.

**<u>डॉ. आंबेंकरांचा राज्यसमाजवाद</u>**

डॉ. आंबेडकारांच्या समाजवादाला राज्यसमाजवाद असे म्हाणतात. डॉ. आंबेडकरांच्या राज्य समाजवादात पुढील तरतुदींचा समावेश होतो.

१) महत्त्वाचे मोठे उद्योगधंदे सरकारणे आपल्या ताब्यात घेणे त्यामुळे आर्थिक शोषणाला आळा बसेल.

२) समाजात भुकेले बेकार असू नयेत यासाठी अर्थव्यवस्थेवर योग्य नियंत्रणाची गरज आहे.

३) डॉ. आंबेडकरांच्या राज्यसमाजवादी विचारात व्यक्तीस्वातांय आणि समाजवाद यामध्ये समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे समाजवादासबंधी विचारामुळे व्यक्तीस्वातांयांचा लोप होत नाही.

४) मजूरांना योग्य वेतन, सूरक्षितता, कामाचे तास आणी मजूराच्या हीताकडे लक्ष देने, मुठभर लोकांच्या हाती सत्तचे केंद्रीकरन होवू न देणे.

५) सामाजीक, आर्थिक व राजकीय विषमतेचे निमूर्लन करणे व जात-पात, स्पृश्य-अस्पृश्य, स्त्रि-पुरुष असे कोणतेही भेदाभेद मान्य न करने ह्यााावरचं डॉ. आंबेडकरांचा राज्यसमाजवाद अवलंबून आहे.

**डॉ. आबेडकरांचा आर्थिक कार्यक्रम:-**

डॉ. आबेडकरांचा आर्थिक कार्यक्रम १५ एप्रिल १९४७ ला जाहीर केला खालील प्रमाणे.

१) राज्याला खाजगी व्यक्तीकडून मग ती जमिनीचा मालक असो वा कुळ गहाणदान, जमिनीस संपादण्याचा अधिकार असेल. ही जमिन संपादतांना ज्या जमिनीवरील त्याच्या हक्काच्या रकमेइतकी रक्कम कर्जरोख्याच्या स्वरूपात दिली जाइल.

२) नुकसान भरपाई म्हणून मिळालेले कर्जरोखे कशाप्रकारे आणि कधी पाठविले जातील हे ठरविण्याचा अधिकार राज्याला राहील.

३) शेती सामुदायीक पध्दतीने कसली जाईल, त्यावर नियंत्रण असेल, शासनाच्या नियमाने शेती कसली जाईल. शेतीच्या उत्पन्नावर कर वसूल करण्याचा अधिकार शासनाला राहील.

४)शेती कसण्यासाठी देतांना जातीपातीचा विचार केला जाणार नाही. कोणी जमिनदार असणार नाही. अथवा कुळ किंवा भूमिहीन असणार नाही मजूरही असनार नाही.

५) सामुदायीक शेतीला लागणारे पाणी, बियाने, अवजारे, खते यासाठी अर्थसाहाय्य करणे शसणाची जबाबदारी राहील.

६) शासनाने दिलेल्या साधनांचा वापर जाणीवपूर्वक अथवा पूर्वग्रहामुळे योग्य प्रकारे करणार नाहीत. त्याना दंड करण्याचा अधिकार शसनाला राहील.

७) जमीनदाराकडे पडलेली हजारो एकर जमीन शासनाने ताब्यात घेवून ती गावकुटूंबाकडे भंदभाव न करता समप्रमाणात वाटून घ्यावी.

८) आयुर्विम्याचा व्यवसाय सरकारी क्षेत्रात असेल व प्रत्येक मिळवत्या नागरीकांचा स्वत:चा विमा सक्तीने उतरवावा लागेल.

वरील योजना शक्यतो लवकर पण जास्तीत जास्त राज्यघटना अमलात आल्यानंतर दहा वर्षाच्या आत ही योजना लागू केली जाईल.

भारतीय समाजव्यवस्थेत समानता कधीच अस्तित्वात नव्हती. चार्तूवर्ण्य व्यवस्थेमुळे समाजाचे विघटन होते. त्यामुळे एखाद्याा विशिष्ट जातीत जन्माला आल्यामुळे त्या जातीतील व्यवसाय लादण्यात येतो. याचा प्रतिकुल परीणाम उत्पादणावर होतो. म्हणून डॉ. आंबेडकरांनी सामाजीक सुधारणेसाठी समतेची उभारणी केली. आर्थिक विषमता आणि गरिबी दूर करण्यासाठी समाजवाद आणने हाच एकमेव उपाय आहे. त्यासाठी उत्पादणावर, वितरणावर आणि वस्तूच्या योग्य किंमीतीवर राज्याचे नियंत्रण असणे व लोकांना भरपूर प्रमाणात योग्य भावात वस्तू उपलब्ध करूण देणे, देशातील मोठमोठ्याा उद्योगधंद्यावर सरकारचे वर्चस्व असणे, शेती व्यवसायाचे राष्ट्रीकरण करणे कामगारांच्या सर्व सुखसोई राज्यान निर्माण करून देणे, अशा रितीने राज्यसमाजवाद अस्तित्वात आला म्हणजे सर्वांचे जिवन सुखी आणि समाधानी व कल्यानकारी होईल असे डॉ. आंबेडकरांचे मत होते.

डॉ. आंबेडकरांचा राज्यसमाजवाद भारतीय राज्यघटनेत दिसून येतो. भारतीय संविधानाने या देशातील सर्व नागरीकांच्या निर्भय स्वातंायासाठी संविधानाच्या तिसऱ्या भागात त्यांना मुलभूत अधिकार बहाल केलेले आहेत. हे अधिकार म्हणजे नागरिकांचे एकप्रकार मुक्तव्दार आहे. मनुष्याच्या चातुर्व्यर्ण्यव्यवस्थेत बहुजन समाजाचे जे अधिकार नाकरण्यात आले. ते अधिकार भारतीय संविधानाने या समाजाला मिळवून दिले सामाजीक न्यायाचा एक भाग म्हणून राज्य घटनेतील १५ व्या कलमानुसार भारतातील कोणत्याही नागरिकास विशिष्ठ धर्माचा, जातीचा, वंशाचा, लिंगाचा या आधारावर भेदभाव करता येणार नाही. कलम २३ आणि २४ कलम १९ आणि ३१ यानुसार भारतीय न्यायाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे. आर्थिक न्याय मिळाल्याशिवाय सामाजीक न्यायाला कुठलाही अर्थ उरणार नाही. राजकीय लोकशीचा विकास करण्यासाठी सामाजीक दायित्वासोबतचं सामान्य माणसाची आर्थिक विळवणूक होवू नये म्हणून बेठबिगारीवर कायद्याने निर्बंध आणले आहे. सर्व नागरीकांना आपली मालमत्ता जतन करण्याचा व संपत्तीच्या संरक्षणाचे अधिकार नसल्यामुळे इतर वर्गाला त्यांच्या आचरण पद्धतीनुसार धार्मिक जिवन जगण्याचा अधिकार दिलेला आहे. कलम ३६ ते ५१ नुसार १४ वर्षाखालील मुलामुलींना मोफत शिक्षणाची सोय मागासलेल्या जातीसाठी शैक्षणीक व आर्थिक तरतूद, संपत्तीची समान विभागणी, स्त्रि-पुरूषांना सारखे वतन, बालकामगारांचे शोषन होणार नाही याची दक्षता, भाषा, प्रांतवाद व त्यावरून होणारा नागरीकांचा छळ या राष्ट्रविरोधी कृत्याला भारतीय संविधानाने आळा घातला आहे.

भारताला स्वातंाय मिळून जवळपास ६६ वर्ष झालीत. परंतू अजूनही कुठल्याही राजकीय यंत्रनेणे मागासवर्गीय बहूजन समाजाला संविधानाच्या संविधानाच्या माध्यमातून जे अधिकार मिळाले त्याची काठेकोरपणे अमंलबजावणी केलेली नाही. भारतीय संविधानाचे मागासवर्गीय समाजाला काय दिले असेल तर या समाजाला आपल्यावर होणाऱ्या अन्याया विरूद्ध संघर्ष करण्यासाठी कायद्याचे शस्त्र त्यांच्या हाती दिले. या शस्त्राच्या बळावरचं अनेक सामाजीक न्यायाच्या चळवळी उदयाला आल्या. भारताच्या राज्यघटनेत राज्यनिर्मितीची मार्गदर्शक तत्वे अंतर्भूत करण्यात आली आहे. या तत्त्वांना अविष्कृत करण्यासाठी आवश्यक ती कार्ये राज्याने करायला हवीत. या मताचा डॉ. आंबेडकर पुरस्कार करतात.

**संदर्भ ग्रंथ**

१) भारतीय संविधान - शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

२) डॉ. भा.ल. भोळे - भारतीय आणि पाश्चिमात्य राजकीय विचार.

३) प्रा. दिपककुमार खोब्रागडे - भारतीय संविधान हिंदूत्ववाद आणि बौद्ध धम्माचा प्रभाव.

४) प्रा. राम मुठाळ - भारतीय आणि पाश्चिमात्य राजकीय विचार.

५) प्रा. बि.पी. पाटील - भारतीय राजकीय विचार.

६) प.सी. काणे - प्रमुख भारतीय आणि पाश्चिमात्य राजकीय विचार.

७) लोकराज्य - ऑक्टोंबर २००६ माहीती व जनसंपर्क महासंचणालय, महाराष्ट्र शासन.

८) सकाळ 'दिक्षा' विशेषांक - २०१३.